Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 519 – 526

DOI: 10.5281/zenodo.10137262

Original Research Article

# महात्मा गांधी यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास

प्रा. अलका मारुती कचरे

सहा. प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय इस्लामपूर, तालुका वाळवा जिल्हा सांगली ४१५४०९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: alkakachare6@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

**मोहनदास करमचंद गांधी** (ऑक्टोबर २, इ.स. १८६९ - जानेवारी ३०, इ.स. १९४८) हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्त्वज्ञ होते. ते एक वकील, वसाहतविरोधी राष्ट्रवादी नेते आणि राजकीय नैतिकतावादी होते. ब्रिटीश राजवटीपासून भारताच्या स्वातंत्र्याच्या यशस्वी मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी महात्मा गांधींनी अहिंसक आंदोलनाचा वापर केला. नंतर जगभरातील अनेक नागरी हक्क आणि स्वातंत्र्य चळवळींना महात्मा गांधींकडून प्रेरणा मिळाली. **महात्मा** (संस्कृत : "महान आत्मा", "पूज्य") असा त्यांचा सन्माननीय उल्लेख प्रथम दक्षिण आफ्रिकेत १९१४ मध्ये केला गेला. आता हा शब्द जगभरात त्यांच्यासाठी वापरला जातो.

महात्मा गांधींच्या राजकीय विचारांचा परिचय करुन घेण्यापूर्वी ते तत्त्वतः अराज्यवादी होते हे लक्षात घ्यावे लागते. संपूर्ण अभाव असलेली समाजरचना त्यांना आदर्श वाटते. पण मानवी स्वभावातील काही उणिवा या कारणांतील तो आदर्श प्रत्यक्षात येणे शक्य होत नाही याची जाणीव झाल्यामुळे ते तडजोडीस तयार होतात, मर्यादित राज्यसत्तेच्या आस्तिवाला ते मान्यता देतात. पाशवी शक्ति आणि हिंसाचार यावर आधारित निरकुंश राज्यसत्तेला मात्र ते स्पष्ट विरोध करतात. कमीत कमी शासन करणारे शासन हेच चांगले शासन असते यावर महात्मा गांधीचा विश्वास आढळतो. राज्याचा व्यक्तिगत जीवनातील हस्तक्षेप महात्मा गांधीजीना मान्य नव्हता. राज्याला विरोध करण्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील. गांधीजींच्या मते राज्य ही एक आपत्ती आहे. मानवी स्वभावातील दोषांमुळे राज्यसंस्थेची निर्मिती झाली. जेव्हा व्यक्तीचा नैतिक विकास पूर्ण होऊन अहिंसेच्या आधारावर समाजरचना निर्माण होईल तेव्हा राज्याची आवश्यकता राहणार नाही तोपर्यंत राज्याची आवश्यकता आहे. जेव्हा समाज नैतिकतेच्या आधारावर उभा

राहील तेव्हा सर्वजण सद्वर्तनी बनतील. प्रत्येक व्यक्ती स्वयंशासित असेल. शक्तीच्या जागी नैतीक शक्ती काम करु लागली तर राज्याची आवश्यकता राहणार नाही. नेतीकता आणि सद्वर्तन हा जेव्हा समाजाचा आधार असतो तेव्हा दंड देणाऱ्या सत्तेचा वापर करणान्या राज्याची आवश्यकता नसते.

**अहिंसेचा घटक राज्याचा आधार आहे**

महात्मा गांधींनी अहिंसा हे तत्व सर्वश्रेष्ठ मानले. राज्याचा आधार हिंसा आणि शक्ती असल्यामुळेच गांधीनी राज्याला विरोध करतात. सैन्य, पोलिस या यंत्रणेद्वारे राज्य शक्तिचा वापर करते. कायद्याचे पालन जनतेला भीतीपोटी करावे लागते. लोकांनी स्वयंप्रेरणेने कायद्याचे पालन केले पाहिजे. हिंसेला महत्व देणारे राज्य

**व्यक्ती विकासाला घातक**

राज्यात काही लोकांच्या हाती सत्ता केंद्रीत होते. सर्वसामान्य व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आणि हक्कांवर आक्रमण होते. आधुनिक काळात राज्याचे कार्यक्षेत्र अतिशय व्यापक झाल्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्यावर संकटात सापडले. व्यक्तीच्या व्यक्तीत्वावर राज्याकडुन आघात होतो. राज्याच्या आज्ञेमागे जबरदस्ती असते. कोणतेही कार्य जोरजबरदस्तीने केले तर ते आत्मियतेच्या भावनेतून होत नाही. तात्विकदृष्टया गांधीजी टॉजस्टॉयप्रमाणे अराज्यवादी होते. राज्याचा हस्तक्षेप कमीत कमी असावा यावरच ते अधिक भर देतात. त्यांचा विरोध राज्यसंस्थेकडे सत्ता केंद्रीत होण्याला होता. राज्यसंस्थेवरील त्यांची टीका मुख्यताः नैतिक आधारावर होती. माणूस हा गांधीजींच्या विचारांचा केंद्रबिंदु होता आणि मानवी स्वातंत्र्य हे सर्वोच्च मुख्य होते. या मानवी स्वातंत्र्यावर त्याच्या उपक्रमशिलतेचा आघात करणाऱ्या सर्व गोष्टींना त्यांचा विरोध होता. महात्मा गांधीजीच्या मते समाजामध्ये व्यक्ती स्वतःच्या इच्छा आणि वासनांवर नियंत्रण ठेवू शकते, तिथे बाह्य सत्तेच्या नियंत्रणाची आवश्यकता नसते. व्यक्ती स्वतःच्या मनावर नियंत्रण ठेवू शकली तरच ती खऱ्या अर्थाने स्वतंत्र बनू शकते. बाह्य सत्तेच नियंत्रण व्यक्ती विकासाला घातक असल्याचे प्रतिपादन महात्मा गांधींनी केले. जिथे सत्ता असत तेथे बळाचा वापर अपरिहार्य असते. राज्यसंस्थेकडे सत्ता मोठ्या प्रमाणात केंद्रीत झालेली असून अशा राज्यात हीसक मार्गाचा वापर अनिवार्य चनलेला आहे. अहिंसक समाज निर्माण करावयाचा असेल तर सत्तेचे केंद्रीकरण टाळले पाहिजे. तडजोड म्हणून गांधीजी मर्यादित राज्यसत्तेला मान्यता देतात. महात्मा गांधींच्या मते राज्यसत्तेला स्वयंमेव असे अंगभूत महत्तव नसते. ज्या प्रमाणात राज्यसत्ता व्यक्तीना आत्मसाक्षात्काराच्या ध्येयापर्यंत पोहोचविण्यास साधनीभूत ठरते त्या प्रमाणात ती समर्थनिय ठरते. राज्यसत्तेकडे पाहण्याचा महात्मा गांधींचा दृष्टीकोन संशयाचा होता. त्या काळात ब्रिटीश राज्यसत्तेच्या क्रौर्याचा जो परिणाम देशवासीयांवर झाला त्यामुळे त्यांचे असे मत्त बनलेले असावे राज्यसंत्ता मर्यादित ठेवणे आणि तिने आपल्या मर्यादांचेउल्लंघन केल्यास नागरिकांनी राज्यसत्तेचा प्रतिकार करणं यांनी महात्मा गांधीनी मान्यता होती. तात्पर्य मर्यादित राज्यम त्यांना मान्य होती.

**रामराज्य आणि ग्राम स्वराज्य**

महात्मा गांधीनी आदर्श राज्याची कल्पना मांडतांना रामराज्य हा शब्द बऱ्याच वेळा वापरलेला आढळतो. मात्र गांधीजीच्या कल्पनेतील रामराज्याचा रामायणातील राज्याशी किंवा धर्माधिष्ठित राज्याशी संबंध नाही हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. भारतीय परंपरेनुसार रामराज्य म्हणजे आदर्श राज्य होय. आपले विचार व्यक्त करतांना गांधीजी अनेकदा पारंपारिक शब्द वापरतात. पण त्यातील आशय आधुनिकच मानावा लागेल. गांधीवादातील रामराज्य म्हणजे ज्या राज्यात व्यक्तीस्वातंत्र्य है. सर्वोच्च मूल्य मानले जाते असे विकेंद्रीत लोकशाही व्यवस्था असलेल राज्य होय. ज्या राज्यात उच्च नीचता नसेल, गरीब- श्रीमंत, स्त्री-पुरुष असा भेद नसेल, वंश आणि पंथ यावरुन भेदाभेद केला जात नसेल ते रामराज्य होय. या रामराज्यात सर्व जमीन आणि शासनव्यवस्था लोकांच्या हाती असेल, न्याय त्वरित आणि कमी खर्चात मिळेल, उपासनेचे विचारांचे आणि लेखनाचे स्वातंत्र्य असेल. या रामराज्यातील कायदे म्हणजे नैतिक नियम असतील. गांधीजींच्या या रामराज्यात समृद्ध, सुखी आणि स्वयंपूर्ण गांवे असतील, त्यामुळे भारतातून ब्रिटीश निघुन गेले की, आपले कार्य संपले असे महात्मा गांधीना वाटत नव्हते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर कोणता प्रश्न हाती घ्याल असा प्रश्न त्यांना विचारण्यात आलेला होता. तेव्हा गांधीजीनी असे म्हणटले होते. अहिंसात्मक राष्ट्ररचना निर्माण करण्याचे कार्य मी हाती घेईल. ज्या राज्यात प्रत्येक व्यक्तीला निर्भयतेने आणि स्वतंत्रपणे राहता येईल अशा राज्याची स्थापना करणे हे महात्मा गांधींचे स्वप्नं होते. एका मध्यवर्ती ठिकाणी दहा-वीस माणसांनी वसून राज्यकारभार केल्यान लोकशाही निर्माण होत नाही. तो तळातून प्रत्येक खेडयातल्या लोकांनी अंमलात आणावयाची असते. महात्मा गांधीनी खेडेगांव हा पायाभूत घटक मानून शासनव्यवस्थेची कल्पना मांडलेली आहे. खेड्यांना जास्तीत जास्त स्वायत्त मिळावी. खेड्यांचा कारभार लोकांनी निवडून दिलेल्या पंचायतीमार्फत चालवावा. खेड्यांनी आपल्या जिल्हयाचा कारभार चालविणारी जिल्हा मंडळे निवडावीत. जिल्हा मंडळांनी प्रांतिक मंडळे निवडावीत आणि या प्रांतिक मंडळांनी मध्यवर्ती मंडळ व त्याचा अध्येक्ष निवडावा अशी शासनव्यवस्था त्यांनी सुचविली. ही सर्व त्यांच्या आदर्श राज्याची वैशिष्ठे होतो ज्याच्यासाठी त्यांनी रामराज्य हा शब्द वापरला. सत्तेच्या खन्याखुन्या विकेंद्रीकरणावर ही शासनव्यवस्था आधारलेली होती. या व्यवस्थेत जास्तीत जास्त अधिकार खेड्यांकडे सोपवून आवश्यक तेवढेच अधिकारी वरिष्ठ मंडळाकडे असावे अशी व्यवस्था होती. निवडणुकीसाठी उभे राहणारे उमेदवार हे निस्वार्थी भ्रष्टाचारापासून मुक्त आणि चारित्र्यसंपन्न असावेत असा त्यांचा आग्रह होता. त्यांच्यात सेवावृत्ती असावी असे महात्मा गांधींचे मत होते.

रामराज्याप्रमाणेच महात्मा गांधींच्या विचारात ग्राम स्वराज्याची कल्पनाही महत्तवाची मानली होती. स्वयंपूर्ण स्वयंशासित खेडेगावांचा संघ म्हणजे राज्य अशी गांधीजीची राज्य संकल्पना होती. यंत्र युगाने खेड्यातील साधे, सरळ, जीवन संपुष्टात आणले. माणसाचे जीवन यांत्रिक बनले. त्यामुळे खेडयांना पूर्वीप्रमाणे स्वायत्तता प्राप्त करुन देण्याची कल्पना उदयाला आली. औद्योगिक क्रांतीनंतर शहरिकरण वाढले, आर्थिक विषमता वाढली आणि त्यामुळे शोषणही वाढले. एकिकडे उद्योगधंद्यांचा प्रचंड वाढीमुळे शहरांची वाढ आणि दुसरीकडे उद्ध्वस्त आणि भाकास जीवन असणारी खेडी असे चित्र देशात निर्माण झाले. खेड्यातील लोकांचे दारिद्रय अधिकच वाढले. आर्थिक सत्तेचे आणि राजकिय सत्तेचे

केंद्रीकरण चाढले. गावातील कामेही प्रांतिक आणि मध्यवर्ती शासनातर्फे होऊ लागली. ग्रामीण भागातील जनतेचे स्वातंत्र्य, उपक्रमशीलता संपुष्टात आली. अशा परिस्थितीत महात्मा गांधीनी ग्राम स्वराज्याची कल्पना मांडली. ही कल्पना प्रामुख्याने विकेंद्रीकरण आणि स्वयंपूर्ण खेडे यावर आधारलेली होती. महात्मा गांधीच्या मते प्रत्येक खेड्याने आपला करभार स्वतःच करावा. मध्यवर्ती शासनाचे त्यावर कमीत कमी नियंत्रण असावे. खेडयातील लोकांच्या परस्पर सहकार्याने सर्वांच्या गरजा भागाव्यात. त्यामुळे शोधन संपेल. खरे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता निर्माण होईल हा आशावाद ग्राम-स्वराज्याच्या कल्पनेमागे होता.

**स्वराज्य आणि लोकशाही**

अहिंसक समाज ही अराज्यवादी अवस्था आदर्श म्हणून कितीही चांगली असली तरी प्रत्यक्षात ती कठीण असल्याची जाणीव गांधीजींना होती. त्यास पर्याय म्हणून महात्मा गांधीनी मर्यादित ठेवणारी जागृत व संघटीत लोकशाही अशा दुहेरी आधारांवर महात्मा गांधीची स्वराज्य कल्पना आधारलेली आढळते. राजकीय स्वातंत्र्य ही स्वराज्यासाठी आवश्यक अट त्यांनी सांगितली आणि याच हेतूचे भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला आपले जीवन समर्पित केले. मात्र स्वराज्य आणि स्वातंत्र्य या संज्ञा समानार्थी नाहीत हे महात्मा गांधींनी स्पष्ट केले. युरोपातील अनेक देश स्वतंत्र असूनही तिथं स्वराज्य नांदत नाही. तळागाळातील व्यक्ती सर्व प्रकारच्या शोषणातून आणि जोखडातून मुक्त होणे म्हणजेच स्वराज्य होय. केवल राजकिय स्वतंत्र्यातून असे स्वातंत्र्य निर्माण होत नाही. गांधीजी एका बाजूने स्वंतंत्रलढ्याचे नेतृत्त्व करित होते तर दुसऱ्या बाजूने खऱ्याखुऱ्या स्वराज्यासाठी रचनात्मक कार्यक्रमाची आखणी करीत होते. या रचनात्मक कार्यक्रमामध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेची पुनर्रचना अस्पृश्यता निवारण, मूलोद्योगी शिक्षण, किसान कामगार संघटन, साधेपणा, व्यासमुक्ती या कार्यक्रमाना समावेश होता. शोषणमुक्ती श्रमातष्ठा भौतिक गरजांवर मर्यादा या मार्गानीच स्वराज्य- साधना केली जाऊ शकते असे महात्मा गांधीचे मत होते. इ.स. १९२५ साली स्वराज्याची व्याख्या करताना महात्मा गांधीनी प्रातिनिधीकतेच्या तत्तवावर विशेष भर दिला. ते म्हणतात, स्वराज्याचा मला अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे लोकांच्या संमतीने चाललेले हिंदुस्तानचे शासन, सार्वत्रिक प्रौढ मताधिकारांच्या आधारे ही संमती व्यक्त झालेली असावी. प्रतिनिधिक शासनाच्या संस्थात्मक बाजूपेक्षा कार्यात्मक नैतिकता महात्मा गांधींना अधिक महत्त्वाची वाटते. संसदीय लोकशाहीचा पुरस्कार महात्मा गांधीजी मर्यादित काळासाठी आणि काही प्रमाणातच केला. महात्मा गांधींनी पश्चिमात्य लोकशाही हे फॅसिस्टवादाचे किंवा नाझीवादाचंच सौम्य स्वरुप वाटते. प्रातिनिधीक संस्थांपेक्षा महात्मा गांधीना संघटीत लोकशाही महत्तवाची वाटते. स्वराज्य हे केवळ काही सुक्षिशित आणि

धनिक लोकांची मक्तेदारी राहणार नाही, तर ते सर्वासाठी असेल. यांशिक, उच्चनेतील त्यात स्थान राहणार नाही. स्वराज्य हे समताधिष्ठित आणि धर्मनिरपेक्ष असेल. कोणत्याही एका धर्माचे राज्य है खरे स्वराज्य नव्हे खऱ्या स्वराज्यात लोकशाही असेल. समता, जनसावंर्भमत्व, स्वस्त आणि त्वरित न्याय, व्यक्तीस्वातंत्र्य या लोकशाहीची वैशिष्ट्ये असतील. गांधीजी लोकशाहीचे कट्टर समर्थक होते. पण प्रतिनिधिक लोकशाही पद्धतीतील उणीवाही त्यांनी स्पष्ट केल्या मतदानाचा अधिकार, निवडणूक लढविण्याचा आणि शासकिय अधिकारपद प्राप्त करण्यचा अधिकार, जबाबदार शासन पद्धती,

राजकीय आणि आर्थिक समता इत्यादी लोकशाहीतील प्रमुख तत्वांचे महत्तव गांधीजीना मान्य होते. पण केवळ राजकीय आणि आर्थिक अधिकार म्हणजे लोकशाही ही कल्पना त्यांना मान्य नव्हती. व्यक्तीस्वातंत्र्याचा हाच अर्थ महात्मा गांधी पुढील प्रमाणे सांगतात. व्यक्ती स्वतंत्र होणे याचा अर्थ व्यक्तीने आपल्या इच्छा आकाक्षा वासना यांचे नियमन आणि नियंत्रण करणे होय महात्मा गांधींच्या में लोकशाहीसाठी राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्यापेक्षाही नैतिक स्वातंत्र्य महत्तवाचे आहे. खरी लोकशाही अहिंसेच्य तत्तवावरच निर्माण होऊ शकते यावर महात्मा गांधीची श्रद्धा होती.

सत्याग्रह आणि निःशस्त्र प्रतिकारः सत्याग्रह आणि निःशस्त्र प्रतिकार हे मार्ग महात्मा गांधीनी परकिय ब्रिटीश राजवटीच्या विरुद्ध लढण्यासाठी वापरले. पण केवळ लढण्याचे मार्ग नव्हते तर त्यामागे गांधीवाधी तत्वज्ञान होते. सत्य आणि अहिंसा हो महात्मा गांधीची प्रमुख तत्वे मानली जातात. या तत्वांना अनुसरुन त्यांनी सत्याग्रह, असहकार, सविनय कायदेभंग, बहिष्कार, उपोषण ही लढयांची साधने निमाण केली. ही सर्व अहिंसात्मक लढवाची साधने होती. सत्याग्रह म्हणजे आग्रह. सत्याचा सतत शोध आणि सत्य प्राप्त करुन घेण्याचा निश्चय होय. या मार्गाचा पहिला प्रयोग गांधीजीनी दक्षिण आफ्रिकेत केला. सत्याग्रहाचा उपयोग करून भारतीय लोकांना स्वातंत्र्याचा लढा यशस्वी करता येईल असा महात्मा गांधीचा विश्वास होता. हिंद स्वराज्य या पुस्तकात त्यांनी असे प्रतिपादन केले की, भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न शस्त्रबळात किंवा बौद्धीक चर्चेने सुटणार नसून तो सत्याग्रहाच्या मार्गाने सुटेल. महात्मा गांधीचा सशस्त्र क्रांतीला तीव्र विरोध होता. त्यामुळेच गांधीजी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे साभेद होते. महात्मा गांधींच्या मते सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळाले तरी त्यातून सत्ता हो लष्करशाह आणि सरंजामशाह यांच्या हाती जाईल आणि सामान्य जनता स्वातंत्र्यापासून वंचित राहील. पारतंत्र्यातुन देशाची मुक्तता झाली. जनतेला स्वातंत्र्याचा लाभ होतो असे नाही. त्यासाठी लोकशाहीची प्रस्थापना व्हावी लागते. सत्याग्रह हाच लोकशाही निर्माण करण्याचा एक मार्ग असुन ही सर्वात योग्य भूमी आहे.

**सत्याग्रह तत्वज्ञान**

सत्याग्रह केवळ एक अहिंसक शस्त्र नव्हते तर तो एक संकल्पनाच मानावी लागेल. गांधीजीच सर्वांत महत्वाचे योगदान तत्वज्ञान होय. तशी सत्य आणि अहिंसा ही तत्तवे नवीन नाहीत. अपनिषदातील तत्वज्ञानात सत्य हाच सर्व विश्वासाचा आधार मानलेला आहे. गीतम बुद्ध, महावीर वर्धमान यांनी मानवाला अहिंसा बाणि प्रेम याची शिकवण दिली. यशू ख्रिस्ताने जगाला दया आणि प्रेम यांची शिकवण दिली. याचा अर्थ महात्मा गांधीनी नवीन काही सांगितलेले नाही.

महात्मा गांधीचे दशष्व्ये म्हणजे त्यांनी या तत्वांना अवलंब राजकीय लढयासाठी केला. सत्य आणि अहिंसा या तत्यांना महात्मा गांधीनी अन्यायाविरुद्ध लढण्याचे मार्ग बनविले त्यांना नवा आशय प्राप्त करून दिला. सत्य हे गांधीजी दृष्टीने सर्वोच्य नैतिक मूल्य होते. ते जीवनाचे अंतिम उदिष्ट होते. सत्याग्रह व्यक्तीगत फायद्यासाठी करावयाचा नसतो. तो नेहमी सार्वजनिक हितासाठी किंवा इतरांच्या हितासाठी करावयाचा असतो. गांधीजी आपल्या दक्षिण आफ्रिकेतील

सत्याग्रह या पुस्तकात सत्याग्रहाचे तत्त्व मी अनुभवातून शिकलो असे प्रतिपादन करतात. महात्मा गांधींच्या मते संयम आणि निर्भयता हे गुण सत्याग्रहीसाठी आवश्यक आहेत. सत्याग्रहामध्ये स्वतंत्र शिस्त स्वतंत्र नियंत्रण आणि स्वयं शुद्धीकरण या गोष्टी असाव्या लागतात. कारण सत्याग्रही हा अन्यायाविरुद्ध सत्याने आणि हीसेविरुद्ध अहिंसेच्या मामाने लढत असतो. ज्याच्याविरुद्ध सत्याग्रही लढत असतो त्याच्यातील दृष्ट प्रवृत्ती आणि द्वेषाची भावना दूर करुन सत्प्रवृत्ती आणि सद्भावना त्याच्या मनात जागृत करणे हे सत्याग्रहाचे उद्दीष्ट असते.सत्य है गांधीवादाचे ध्येय आहे तर अहिंसा त्या ध्येयाकडे जाण्याचा मार्ग आहे. तरीही ही दोन तत्वे परस्परांशी एवढी आहे कि त्यांना एकमेकांपासून वेगळे करता येत नाही. गांधीवादात साध्ये आणि साधन यात एकरुपता मानलेली आहे. त्यामुळे सत्याएवढेच महत्त्व आहसला आहे. द्वेषाने, स्वार्थी भावनेने दुसऱ्याला पीडा देणे, त्याच्यावर शारीरिक हल्ला करणे म्हणजे हिंसा होय. शारीरिक तसेच मानसिकदृष्टया अश हिंसेपासून अलिप्त राहणे म्हणजे अहिंसा होय. अहिंसेचे पालन करणारा दुसन्याला क्लेश देत नाही. दुसऱ्याबद्दल द्वेषाची भावना मनात बाळगत नाही. अहिंसा व्रताचे पालन करणे अतिशय कठीण असते. मित्रा माणूस अहिंसेचे पालन करु शकत नाही अहिंसा म्हणजे भ्याडपणा नके, दुर्बलता नव्हे. अहिंसा हा हिंसेबरोबर लढण्याचा मार्ग आहे.

**धर्म आणि राजकारण या विषयीचे विचार**

महात्मा गांधीजी धार्मिक होते. लोकमान्य टिळकांप्रमाणे महात्मा गांधीही धर्माचा वापर राजकिय हेतूसाठी केला. महात्मा गांधी आवश्यकतेमुळे राजकारणात आले. तसा त्यांचा पिंड एखाद्या धर्मगुरुसारखा मानावा लागेल. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्याप्रमाणे राजकारणाचे आध्यात्मीकरण व्हावे असे गांधीजींना वाटत होते. दोघांनीही आध्यात्मिकरण म्हणजे नैतिकीकरण असेच सुचवायाचे आहे. गांधी विचारात प्रामुख्याने हिंदू धर्माची प्रतीके व परिभाषा असली तरी त्यांची धर्मनिष्ठा कोणत्याही विशिष्ट धर्माचा चौकटीत बसणारी नव्हती. विशिष्ट धर्माच्या आधारे राजकारण करणे त्यांना मान्य नव्हते. हिंदू, जैन, युद्ध, ख्रिस्ती, इस्लाम बासारख्या सर्व संप्रदायाचा पंथाचा प्रभाव महात्मा गांधीवर होता. सर्वधर्मसमभाव ही संकल्पना गांधीवादीच मानावी लागेल. विविध धर्म म्हणजे एकाच ध्येयाकडे जाणारे विविध मार्ग आहेत असे त्यांनी प्रतिपादन केले. मात्र् धर्मातील दोष आणि उणिवाही त्यांनी माना केल्या. गांधीजी असे म्हणतात कि धर्मासंबंधीच्या चितनामतुन मी अशा निर्णयाप्रत आलेलो आहे की, सर्व धर्म खरे आहेत आणि प्रत्येक धर्मात काही चुका आहेत. याचा अर्थ सर्व धर्मातील मुलभूत तत्वे सारखीच आहेत आणि ती खरी आहेत. पण प्रत्येक धर्मात निर्माण झालेल्या काही रूढी आणि परंपरा चुकीच्या आहेत. गांधीजी धर्माकडे कर्तव्य या भावनेने पाहत असल्याने त्यांनी राजकारण आणि धर्म यांना वेगळे मानलेले नाही. याच कारणासाठी आचार्य जावडेकर गांधीजींचे वर्णन राजकीय कर्मयोगी असे करतात. महात्मा गांधीनी जरी रामराज्य या शब्दाचा प्रयोग केला तरी त्याचे स्वरुप धर्माधिष्ठित राज्याचे नाही. मात्र न्याय आणि नीतिमत्ता या तत्त्वांवर आधारलेल्या राज्याचे निश्चित आहे. हिंदूंची देशात जास्त संख्या आहे म्हणून जर भारतात हिंदू राज्य स्थापन झाले तरी त्याला आपण स्वराज्य म्हणणार नाही. हे महात्मा गांधी स्पष्ट करतात. एवढेच नव्हे तर आपण

त्याचा सर्व सामर्थ्यांनीशी प्रतिकार करू असाही इशारा देतात. राजकारणाला धर्माचे अधिष्ठान म्हणजे एखाद्या संप्रदायाचे अधिष्ठान नव्हे तर नीतीमत्तेने अधिष्ठान असेच त्यांना सुचवायचे होते. या अर्थाने ते धर्मनिरपेक्ष होते.

**राष्ट्रवाद व आंतराष्ट्रवादाविषयीचे विचार**

गांधीजींचा पिंड आतरराष्ट्रीयवादाचा होता. त्यांनी संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा विचार केला. किंबहुना संपूर्ण सजीव सृष्टीच्या ऐक्याचे ते पुरस्कर्ते होते. प्रत्येक प्राणीमात्रावर त्यांचे प्रेम होते. तो त्यांचा परतधर्म होता. केवळ मानवी हिंसाचारालाच नाहीतर इतर प्राण्यांचा हिंसाचारालाही महात्मा गांधीचा विरोध होता. पण आतरराष्ट्रीयवादी असणारे गांधीजी राष्ट्रवादीही होते. राष्ट्रवाद आणि आतरराष्ट्रवा यांच्यात अंतविरोध असण्याचे कारण नाही अशी त्यांची भूमिका होती.महात्मा गांधीचे स्वतःच्या देशावर देशबाधवांवर भाष, संस्कृती, धर्म, परंपरा यावर प्रेम होते. आधी राष्ट्रवादी झाल्याशिवाय कोणालाही खऱ्या अर्थाने अंतरराष्ट्रवादी होता येणार नाही असे त्यांना वाटत होते. हिंदू-मुस्लिम ऐक्याप्रमाणे महात्मा गांधीच्या कार्यक्रमात अस्पृश्यता निवारणालाही महत्त्वाचे स्थान होते. अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरचा कलंक आणि मानवतेविरुध्दचा अपराध तर आहेच पण राष्ट्राच्या एकतेच्या आड येणारा तो फार मोठा सामाजिक अडथळा आहे यावर महात्मा गांधी ठाम होते. धार्मिक, जातीय घटकांप्रमाणेच प्रादेशिक घटकांचाही विचार महात्मा गांधीनी राष्ट्र उभारणीच्या संदर्भात केलेला आढळतो. भाषावार प्रांतरचनेमुळे भारताच्या एक्यावर अनिष्ट परिणाम होईल हे मत त्यांना मान्य नव्हते. निरोगी स्वरूपाची प्रांतीयता राहणे स्वभाविक आणि अनिवार्य आहे. मात्र तो संकुचित किंवा फुटीर होता कामा नये. गांधीजीच्या सामाजिक विचारात समता अस्पृश्यता निवारण स्वी-स्वातंत्र्य यांना महत्त्वाचे स्थान आहे. महात्मा गांधी म्हणतात अस्पृश्यतेच्या पालनाने त्याचे संरक्षणही त्यांना करता येणार नाही. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी महात्मा गांधीनी स्वतःच्या अनुयायांचा एक गट तयार केलेला होता. अस्पृश्यांना ते हरिजन म्हणत त्यांच्या काही साप्ताहिकांपैकी एका साप्ताहिकाचे नांव हरिजन असे होते. या सर्व साप्ताहिकांचा उपयोग अस्पृश्य निवारणासाठी केला त्यांनी अस्पृश्य विरोधी आंदोलन अधिक महत्त्वाचे वाटले. महात्मा गांधींच्या मते अस्पृश्ता मानवनिर्मित असून, या प्रथेचे समर्थन कोणत्याच थाने केलेले नाही. म्हणून अस्पृश्तेचे पालन अधार्मिक ठरते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी समाजसुधारकानी सक्रिय प्रयत्न करावेत असे ते सांगत. थोडक्यात महात्मा गांधींचे राजसंस्थेविषयीचे विचार पाहीले असता मानव कल्याण व राष्ट्रती हा ऐकमेव दृष्टीकोन दिसून येतो.

**संदर्भ साधने**


१. mr.m.wikpedia.org
२. https://www.loksatta.com
३. श्री. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपादक), मराठी विश्वकोष खंड १२. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई
४. सरकार सुमित, मॉडर्न इंडिया, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली.
५. डॉ. सावल्या. आर.एस. डी. इंडियन पॉलिटिकल थॉट, हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई.